

गोदावरी फाऊंडेशन

गोदावरी आई महोत्सव ( मातृवंदन सोहळा )

"आई आमची सर्व प्रथम गुरू, त्या नंतर आमचे अस्तित्व सुरू"

- दिनांक -
बुधवार दि. ७ डिसेंबर २०२२

- वेळ -
सायंकाळी ४.३० वा.

- स्थळ -
गोदावरी फाऊंडेशन संचलित,
डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, जळगांव खुर्द




साप्ताहिक **गोदावरी** परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

आई महोत्सव

* वर्ष २३ वे * अंक ४९ * सोमवार ०५/१२/२०२२ * डाक ०७/१२/२०२२ * पाने - ४ * किंमत २ रुपये


# जन्म घेऊनी तुज पोटी...जीवन जाहले कृतार्थ!

## मातृवंदन सोहळ्यानिमित्त गोदावरी आईंप्रती प्रतिष्ठितांनी व्यक्त केल्या बोलक्या भावना

जळगाव – जन्म घेऊनी तुज पोटी...जीवन जाहले कृतार्थ....तव प्रेमाच्या सागरात मी डुबुनिया यतार्थ.... ह्या मोजक्या शब्दातून आईची महती स्पष्ट करण्यात आली आहे. नऊ महिने उदरात आणि जन्मानंतर शेवटच्या श्वासापर्यंत प्रेम, जीव लावणारी एकमेव व्यक्ती म्हणजे आई. अशाच प्रेमस्वरूप आई श्रीमती गोदावरी पाटील यांचा दि. ७ डिसेंबर रोजी दुपारी ४ वा. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय परिसरात आई महोत्सव म्हणजेच मातृवंदन सोहळा गोदावरी परिवारातर्फे आयोजित करण्यात आला आहे. या मातृवंदन सोहळ्यानिमित्त गोदावरी आईंप्रती लोकप्रतिनिधी आणि समाजातील प्रतिष्ठीत मान्यवरांनी अत्यंत बोलक्या शब्दात भावना व्यक्त करीत त्यांची महती विशद केली आहे.



### समाजासमोर नवा आदर्श

गोदावरी मावशीला शुभेच्छा... दिर्घायुष्य व निरोगी आरोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना... गोदावरी मावशीबद्दल मला खूप आदर आहे, दरवर्षी आमची पंढरपुरला भेट होते. आत्मारुपी ईश्वर म्हणजे आई आणि तिचा सन्मान करणं हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आईमुळे घडलेले उल्हासदादा व आम्ही देखील आईमुळेच घडलेलो आहे. आताची परिस्थिीती लक्षात घेता आईकडे दुर्लक्ष केले जाते मात्र उल्हासदादांनी या मातृवंदन सोहळ्याद्वारे भावी पिढीसमोर आदर्श उभा केला आहे. आई जन्म देते, संस्कार देते, घडविते, मोठी करते त्यावेळी सन्मान मुलाला मिळतो मात्र तिचा सन्मान होणं गरजेचे आहे आणि उल्हासदादांनी मातृवंदन सोहळ्याच्या निमित्ताने समाजासमोर नवा आदर्श उभा केला आहे.



**– रमेश विठू पाटील,**
**कुटूंबनायक, भोरगाव लेवा पंचायत पाडळसे**

### आईचं प्रेम, आशिर्वादामुळेच गोदावरी परिवाराचा वटवृक्ष


**आई म्हणूनी कोणी, आईस हाक मारी,**
**ती हाक येता कानी मज होय शोक वानी,**

हे कुण्या कविचे वाक्य आठवते. आईचं महत्व दोन शब्दात, दोन मिनीटात, दोन युगात सांगता येण्यासारखे नाही. ज्या मातेने मला जन्म दिला, माझ्यावर संस्कार केले, लहानाच मोठं केल, बोट धरुन चालायला शिकवलं आणि ह्या जगामध्ये आज मी जो आहे ते माझ्या आईमुळे. तिने मला जन्म दिला. जगामध्ये नाव आहे, कर्तृत्व आहे जे काही आहे ते आईमुळे आहे. आई करुणामयी आहे माया न विसरता येणारी आहे. मरेपर्यंत आईची माया सोबत राहिल अशी अपेक्षा असते. परंतु दुर्दैवाने ते होवू शकत नाही. ज्यांना ज्यांना वर्षानुवर्षे आईचं मातृत्व लाभत, आशीर्वाद लाभतात ते भाग्यवान आहे आणि अशा स्थितीत डॉ.उल्हास पाटील साहेबांना त्यांच्या आईचे आशीर्वाद **(पान २ वर)**



### मातृवंदन सोहळा म्हणजे समस्त मातांचा सन्मान

जळगाव जिल्ह्यात गोदावरी नावाने शिक्षणसंस्थांच मोठ जाळ विणलं ते आमचे मित्र डॉ.उल्हास पाटील. त्यांच्या संकल्पनेतून मातृवंदन सोहळा साजरा केला जात आहे ही एक अभिनव कल्पना आहे. परदेशात फादर्स डे, मदर्स डे वगैरे दिवस असतात आणि आपल्याकडे देखील माता–पित्यांविषयी तसेच आजी–आजोबांविषयीही कृतज्ञता व्यक्त करण्याची एक वेगळीच रचना असते. एक प्रकारे त्याला धरुन उल्हासजींनी हा आई महोत्सव या ठिकाणी साजरा केल्याचे ठरविले ही एक चांगली गोष्ट आहे. आपल्याकडे कुटूंब व्यवस्थेचं खुप महत्व आहे आणि स्वत: उल्हासजींच्या आयुष्यात गोदावरी आई म्हणजे त्यांच्या मातोश्री ज्या खंबीरपणे उभ्या राहून उल्हासजींच्या व्यक्तीत्व विकासात, **(पान २ वर)**



### वात्सल्यमूर्ती गोदावरी आई

गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील यांच्या मातोश्री आई गोदावरी यांच्या सन्मानार्थ आयोजित सोहळ्यानिमित्त आपणासर्वांशी संवाद साधताना विशेष आनंद होतो आहे. आई गोदावरी वयाच्या नव्वदीतही आपल्या सर्वांच्या सोबत आहेत ही खरोखरच भाग्यदायी बाब आहे. आपल्या परिवारातील ज्येष्ठांचे स्थान सर्वाधिक श्रेष्ठ असते, त्यांनी आयुष्यभर केलेल्या कष्टामुळे, समर्पणामुळे आपण उभे असतो याची जाणीव पुढील पिढीतील प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक सदस्याने खोलवर बाळगणे आणि त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देणे हे केवळ आपले कर्तव्यच नव्हे तर तो आपल्यावरील दृढ संस्कार आहे. अशा कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन केल्याबद्दल डॉ. उल्हासजी पाटील यांचे मी अभिनंदन **(पान २ वर)**



### मातेचा सन्मान म्हणजे जीवनार्थ कळणे

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात मातेचे स्थान अनन्यसाधारण असते. नऊ महिने ज्या मातेच्या उदरात वाढून जगात प्रवेश करतो, ती माता दूधाच्या रुपाने संस्कारी करते, संगोपन करुन घडविते यात वडिलांचाही सहभाग असतो, त्यात शंका नाही. मात्र बाळावर पहिले आणि अमीट असे संस्कार घडतात ते मातेचे. त्यामुळे प्रत्येक माणसाच्या जीवनात आईचं स्थान देवाच्या बरोबरीच असत असं मला वाटतं. डॉ.उल्हास पाटील यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य विस्तृत आहे, फार मोठ आहे आणि या कार्याला त्यांनी आपल्या आईचं नाव दिल आहे **गोदावरी फाऊंडेशन.** आई हिच त्यांची प्रेरणा आहे, अकाली वडिलांच निधन झाल्यानंतर खचून न जाता कुटूंबाला सांभाळले, मोठ केले, कष्ट **(पान २ वर)**



# वात्सल्याचा गोदाई वंदन सोहळा...!

आई या दोन अक्षरी शब्दाची गरिमा, महिमा सारं विश्व व्यापून आहे. आईची महत्ता यथार्थपणे सांगायचे झाल्यास 'पृथ्वीची क्षमता आणि पाण्याची रसता पहावयाची असेल तर, ती 'आई' जवळच आहे. 'आई ' हेच वात्सल्याचे धन...! ही प्रस्तावना मांडण्याचे कारण की, विवरा (ता.रावेर) स्कूलच्या माजी शिक्षिका श्रीमती गोदावरी वासुदेव पाटील यांचा मातृवंदन सोहळा ७ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात साजरा होणार आहे. मातोश्रींचा वाढदिवस म्हणून त्या निमीत्त हा सोहळा नाही तर आईच्या ऋणात राहून आगळा वेगळा आणि समाजासाठी प्रेरक ठरावा या दृष्टिकोनातून त्यांचे पुत्र श्री सुभाष, डॉ. उल्हास पाटील आणि कन्या सौ. प्रमिलाताई या बहीण भावंडांनी आयोजित केलेला हा सोहळा आहे. डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय क्षेत्रातील एक प्रथितयश प्राप्त नाव, ज्यांनी शून्यातून आपलं विश्व उभं केलेलं व्यक्तिमत्व.. मातोश्री गोदावरी पाटील यांच्या 'मातृवंदन' सोहळ्या निमित्त त्यांच्या जीवन प्रवासातील जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि आपल्या मुलाचं आयुष्य घडवितांना दिलेली झुंज विलक्षण प्रेरणादायी तर आहेच पण पेरलेल्या संस्काराचा वस्तुपाठ देखील आहे. शिक्षण आणि परिश्रमाच्या संस्कारातून यशाला कशी गवसणी घालता येते, याचं उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्या अपत्यांनी समाजामध्ये मिळविलेला लौकिक होय. खान्देशच्या मातीचा गुणधर्मच मोठा आगळा वेगळा आहे. जिद्द, परिश्रम हीच पार्श्वभूमी... श्रीमती गोदावरी पाटील यांची लग्नाआधी आणि नंतरची स्थिती लक्षात घेता कोणतेही आर्थिक किंवा कौटुंबिक प्रभाव नसताना त्यांनी स्वतः चे शिक्षण त्यानंतर शिक्षिका म्हणून मिळविलेली नोकरी त्यांच्या जिद्द आणि परिश्रमाचे फलित आहे. एक आदर्श माता, उत्कृष्ठ शिक्षिका आणि



या प्रवासात आलेली आव्हाने पेलतांना त्याच्यातील स्त्री शक्ती ची प्रचिती येते. विशेषतः अकाली पती निधनाने निर्माण झालेला अंधार दूर सारत आपल्या दोन्हीं मुलांना उच्च शिक्षणापर्यंत पोहचविण्यासाठी केलेली धडपड ही आदर्श मातेच्या लौकिकाचे अप्रतिम उदाहरण ठरावे. केवळ आपल्या मुलांनाच घडविले नाही तर आपल्या शाळेतील व सान्निध्यात आलेल्या मुलांना ही घडविले. त्यांनी विवरे गावातील महिलांना अल्प बचतीचे महत्व ही पटवून दिले. अल्पबचतीसह, कुटूंब नियोजन, किसान शाळा अश्या विविध क्षेत्रात ही त्यांनी आपला ठसा उमटविला, म्हणून त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यपनाचे काम करीत असताना हजारो विद्यार्थ्यांना सु-संस्कारित केले. आदर्शवत विचार आणि कृती ही.. त्यांनी आपल्या नातवंडांना आपला समग्र जीवनपट एका प्रदीर्घ पत्राच्या माध्यमातून उलगडून दाखविला आहे. या अपेक्षेने की, जे विचार मूल्य व संस्कार मी माझ्या मुलांमध्ये रुजविले ते पुढील पिढीत ही संक्रमित व्हावेत. त्या जीवनाच्या व्याख्येबद्दल पुढे म्हणतात, जीवन एक शाळा आहे, जीवनाच्या शाळेत आपण नित्य काहीतरी शिकत असतो, जीवनात ध्येयालाच देव मानले पाहिजे. ध्येय रहित जीवन हे जीवनच नव्हें. एक ग्रामीण शिक्षिका ही सर्व सामान्य कुटूंबातील असूनही त्यांच्या विचारांची उंची प्रगल्भ आहे. अश्या या मातेला शतशः वंदन... **इंद्राची सत्ता, कुबेराची संपत्ती सारं काही एका आईपुढे तुच्छ ठरतात कारण 'माये विना दैवत नाही दुजे' एका उर्दू शायराने आई ची महती विशद करताना म्हटले आहे, चलती फिरती आँखोसे अजां देखी है, मैने जन्नत तो नही देखी है माँ देखी है...!**

**- सुरेश उज्जैनवाल,**
**पत्रकार तथा जिल्हाध्यक्ष**
**व्हाईस ऑफ मीडिया, महाराष्ट्र**

## // न मातुः परदैवतम् //
## स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी

या विशेषणाला खऱ्या अर्थाने पात्र ठरणाऱ्या गोदावरी परिवाराच्या आई महोत्सवाच्या सत्कारमूर्ती श्रीमती गोदावरी पाटील उर्फ गोदाई. श्रीमती गोदावरी आई आणि कै.वासुदेव पाटील हे शिक्षक दांम्पत्य, विद्यार्थ्यांचेच नव्हे तर समाज शिक्षणाच व्रत अंगिकारलेले हे सत्यवान सावित्रीचे प्रतिरुप.. त्यातच श्रीमती गोदाई म्हणजेच सावित्रीची लेकच, म्हणतात ना-शिक्षणात गरीबी कधीही आडवी येत नाही. तद्वतच या दांम्पत्याला ना शिक्षणात ना शिकवण्यात आपली गरीबी कधीही आडवी आली नाही. श्रममेव जयते या वाक्यावर विश्वास ठेवत या दोघांनी आपले व्रत सुरु ठेवले. श्री सुभाषदादा, डॉ.उल्हास पाटील सर, सौ.प्रमिलाताई या अंकुरांना संस्कारीत करून त्यांना नितिमत्तेचे बाळकडू पाजत राहिले. **केल्याने होत रे आधी केलेची पाहिजे** या संस्काराचे बीजरोपण करणारे हे दांपत्य तत्कालीन कालखंडात साऱ्या समाजाचे आदर्श ठरले. ऐन १० व्या वर्गात असतांनाच डॉ.उल्हास पाटीलांचे पितृछत्र हरपले. श्रीमती गोदावरी आई यांच्यावर जणूकाही आकाशच कोसळले. पण याही परिस्थीतीत न खचता त्यांनी आपले कार्य प्रज्वलीत नंदादिपाप्रमाणे सुरुच ठेवले. आपली नोकरी, तिन्ही मुलांचे संगोपन, समाजकार्य अविरत सुरु होते. मुलांचे संगोपन व शिक्षण पूर्णत्वास नेले. त्यातच डॉ.उल्हास पाटील हे अंत्यंत यशस्वी डॉक्टर म्हणून प्रसिद्ध झाले. त्यांनी गोदावरी फाऊंडेशनची स्थापना केली. गोदावरी परिवाराच्या होऊ घातलेल्या मातृमहोत्सवाच्या सत्कारमूर्ती श्रीमती गोदाई कर्तृत्ववान आईप्रमाणेच डॉ.उल्हास पाटील यांनी **गे माय भूमी, तुझे मी फेडू पांग सारे** या उक्तीला साजेसा आई महोत्सव साजरा करायचे ठरविले. गोदाई नव्वदीच्या उंबरठ्यावर असतांना कृतज्ञता व्यक्त करण्याचे गोदावरी परिवाराने ठरविले, ही सर्वात विशेष उपलब्धी आहे. श्रीमती गोदाईच्या कृपेने व डॉ.उल्हास पाटील यांच्या कर्तुत्वाने आजूबाजूचा परिसर व अनेक कुटूंब सुजलाम सुफलाम झाले आहे. समाज ऋण गोदाईच्या आशीर्वादानेच पूर्ण झाले आहे.



धन्य ती गोदाई व धन्य तो गोदावरी परीवार. अशा हजारोंच्या पोशिंद्यास जन्म देणाऱ्या गोदाई यांना माझा त्रिवार मुजरा व नमस्कार.

**- श्री.डी.टी.राव,**
**राजपुरोहित**, गोदावरी फाऊंडेशन.

## गोदावरी मावशीमुळे आमचं घर सुसंस्कृत झालं

रमेश दादा सांगतात, गोदावरी मावशीच्याच मार्गदर्शनाखाली आमची मुले वाढली व अजुनही वाढत आहे. त्यांच्यामुळेच आमच्या मुलांवर चांगले संस्कार झाले. शिक्षण झाले व आज आमची मुले चांगल्या मार्गावर आहेत. त्यांच्यामुळेच आमचे घर सुशिक्षीत व सुसंस्कृत झाले, असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे आज आमचे जीवन शांतमय आहे.



परिस्थीती जेव्हा अवघड असते तेव्हा व्यक्तीला प्रभाव आणि पैसा नाही तर स्वभाव आणि संबंध कामाला येतात.

**- श्री. रमेश राणे**
**प्रगतीशील शेतकरी, विवरे**



## प्रेमस्वरुप आई, वात्सल्यसिंधू आई

आईने जे कष्ट केले आणि डॉ.उल्हास पाटील यांनी जे शैक्षणिक साम्राज्य उभे केलं त्याला तोड नाही. राजकारण करत असतांना समाजकारण करण आणि समाजकारण करत असतांना सेवाभावी काम करणं आणि त्या त्या ठिकाणच्या तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची वाट निर्माण करुन देणे याच्याइतकी सेवा मी दुसरी मानत नाही आणि हा आईने दिलेला ऐवज आहे. गोदावरी आई ह्या ९० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आईला दिर्घायुष्य लाभो अशी मी प्रार्थना करतो. आईची प्रेरणा जी असते, प्रेमस्वरुप आई, वात्सल्य सिंधू आई, असं म्हणत माधव ज्यूलियन पुढे म्हणतात की, **घे जन्म तू फिरुन येईन मी ही पोटी आणि खोटी ठरो न देवा ही एक आस मोठी** आणि साने गुरुजींनी लिहिलेले श्यामची आई हे पुस्तक नुसते श्यामसाठी नाही आईसाठी नाही तर तमाम डॉ.उल्हास पाटील यांच्यापासून तर जी जी माणसं काम करतात त्यांच्यासाठी आहे. कर्तुत्व आहे, वर्कृत्व आहे, दातृत्व आहे, सेवाभाव करण्याची तयारी आहे आणि हे सगळं करत असतांना जे तुम्ही केलं खासदार म्हणून व्यक्तीगत म्हणून असेल आई म्हणते की उल्हास तु जे केलं ती वाट बरोबर आहे, उत्तरोत्तर आणखी समाजसेवा करं, त्यासाठी माझे माझे आशीर्वाद कायमच तुझ्या पाठिशी आहे.



**- श्री ना.धो.महानोर, कविवर्य**

मी सौ. सुरेखा अरविंद काळे (बदलापूर) मातृवंदननिमित्त मला मत व्यक्त करायची संधी मिळाली आहे.

**आकाशात भरारी घेताना**
**पक्षाला पंख असावे लागतात**
**मनमोहक वातावरणासाठी**
**फुलाला सुगंध असावा लागतो**
**तसेच विद्यार्थ्याला शिक्षण घेताना**
**चांगला शिक्षक असावा लागतो.**



अशाच आमच्या शिक्षिका श्रीमती गोदावरीबाई उत्तम शिक्षिका आहेत. त्या अतिशय प्रेमळ आणि सुस्वभावी आहेत. त्या अभ्यासाच्या बाबतीत पण खूप कडक होत्या. त्या विद्यार्थ्यांवर स्वत:ची मुलं समजून प्रेम करायच्या. अशा गुरुंना माझा शतश: प्रणाम आहे.

(पान १ वरुन)

## आईचं प्रेम, आशिर्वादामुळेच...

८९ व्या वर्षापर्यंत लाभल आहे हे त्याचं भाग्य आहे. १०० वर्षापर्यंत त्यांची आई जगावी, डॉक्टर साहेबांना त्यांचे आईच प्रेम लाभावं आणि त्याठिकाणी खरं म्हणजे इयत्ता दहावीत असतांना डॉ.उल्हास पाटील यांच्या माथ्यावरुन पितृछत्र हरपले आणि त्यानंतर या गोदावरी मातेने एकटीने त्यांना घडवलं, संस्कारित केल आणि त्यामुळेच ते डॉक्टर होवू शकले आणि त्यातून मेडिकल कॉलेज, इंजिनियरिंग, कृषी महाविद्यालय, विधी महाविद्यालय सह सर्वच विद्याशाखांच्या संस्थांच साम्राज्य आहे, त्यांच्यामुळे त्या गोदावरी मातेमुळे आणि त्या आशीर्वादामुळेच ते मोठे होवू शकले. अशा स्वरुपाची आई प्रत्येकाला लाभावी. डॉ. उल्हास पाटील हे आई महोत्सव साजरा करत आहे हा एक चांगला उपक्रम आहे. त्यांच्या वयाच्या मातांचाही यावेळी सन्मान होणाार आहे. जगात असे अनेक लोक आहे ज्यांना मातृत्व हिरावल गेले असते अशा स्थितीत आईची आठवणही येत नाही. मात्र डॉक्टर उल्हास पाटील साहेब भाग्यवान आहे, त्यांना मातेचे प्रेम आशीर्वाद लाभत आहे. आई ही आईच आहे. तिचं प्रेम सातत्याने लाभो, अशी अपेक्षा व्यक्त करून मातृवंदन सोहळ्याला शुभेच्छा देतो.

**- श्री एकनाथराव खडसे, आमदार**

## मातृवंदन सोहळा म्हणजे...

नेतृत्व विकासात योगदान दिले आहे ते वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा सोहळा म्हणजे प्रत्येकाच्या आईबद्दलची भावना प्रकट करण्याचा सोहळा आहे. हा सोहळा स्वत: डॉ.पाटील करीत असून ही एक चांगली परंपरा निर्माण होत आहे. एका स्त्री कर्तुत्वाचा देखील हा सन्मान आहे. कारण गोदावरी बाईंनी खरोखरच हिंमतीने मुलाच्या मागे सगळी ताकद उभी करुन त्यांच्या कार्यकर्तुत्वाचा विकास केल्याची मला चांगली माहिती आहे. आम्ही अनेकदा उल्हासजींच्या घरी गेलो असून आईंच्या वात्सल्यपुर्ण आदरातिथ्य करण्याचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे या अभिनव संकल्पनेबद्दल डॉ. उल्हास पाटील यांच, त्यांच्या सहकाऱ्यांच मनापासून अभिनंदन आणि आई महोत्सवाच्या केंद्रस्थानी असलेल्या गोदावरी बाई पाटील यांच अभिनंदन आणि नमस्कार...

**- डॉ.विनयजी सहस्त्रबुद्धे, माजी खासदार**

## मातेचा सन्मान म्हणजे...

करुन समाजासोबत राहून मुलांना समाजाभिमुख केल, शिक्षण पूर्ण केलं. आणि त्यांना उभारणी दिली व समाजाची सेवा करण्यासाठी सक्षम केले. जे ही काम उल्हासदादांनी केले, त्यात गोदावरी मातेचा सर्वात प्रमुख व मोठा वाटा आहे, किंबहूना त्यांच्यामुळेच हे सर्व करु शकले. ही भावना ठेवून उल्हासदादा आज मातृवंदन सोहळा करीत आहे, कुटूंबातील मंगल कार्य होण्यापूर्वीच... ज्या मातेने जन्म दिला, संस्कार दिले, आधार दिला व समाजात उभं राहायला सक्षम केलं अशा मातेला अभिवादन करावं, तिच पूजन कराव आणि मातृवंदन सोहळ्याच्या माध्यमातून समाजाला एक वेगळा संदेश द्यावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले गेल्याचे मला जाणवते. त्याबद्दल मी त्यांचे व परिवाराचे मनापासून अभिनंदन करतो. गोदावरी मावशींनी जे काही कष्ट घेतले त्याला तोडच नाही, वयाच्या ८९ वर्षापर्यंत ज्या ज्या ठिकाणी काम केल तेथील माणसांना जोडून ठेवलं व उल्हासदादांच्या कार्यात त्यांचा आशिर्वाद प्राप्त करुन दिला. अगदी निवडणूका जरी असल्या तरी एखाद्या तरुणालाही लाजवेल अशा जिद्दीने व ताकदीने आमच्या गोदावरी मावशी आपल्या मुलासाठी गावोगावी माता भगिनींना, कार्यकर्त्यांना वडिल धाऱ्यांना भेटून आवाहन करतात म्हणून समाजाशी नाळ बांधून घेण्याचं काम या मातेने, गोदावरी प्रतिष्ठानसाठी केलं आहे. त्याची जाणिव ठेवत उल्हासदादांनी इतका सुंदर कार्यक्रम आयोजित केला, त्याबद्दल अभिनंदन करत शुभेच्छा देतो. आणि या कार्यक्रमात सहभागी होतांना मला आनंद होत आहे. ज्या ठिकाणी मातेचा सन्मान केला जातो त्याठिकाणी **जीवनाचा अर्थ खऱ्या अर्थाने माणसाला कळला आहे**, अस मानायला पाहिजे म्हणून मी संपूर्ण पाटील परिवाराला शुभेच्छा देतो.

**- श्री.शिरीष चौधरी, आमदार, रावेर**

## वात्सल्यमूर्ती गोदावरी आई...

मातोश्रींना आदरपूर्वक वंदन करतो, त्यांच्या शतकपूर्तीचा सोहळा असाच आनंददायी वातावरणात होण्यासाठी देवाचरणी प्रार्थना करतो. आपलं जगणं पवित्र, करूणाशील, प्रेमजिव्हाळ्यानं परिपूर्ण आणि स्फूर्तिदायी होतं. पृथ्वीवरची आपली जीवनयात्रा म्हणजे ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग आणि उद्यमयोग यांचा पवित्र संगमच!

**- अशोकभाऊ जैन, अध्यक्ष जैन उद्योग समूह, जळगाव**

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## मातृवंदन सोहळा बोध देणारा ठरणारं

मातृवंदन सोहळा ही काळाची गरज आहे. अलीकडे सासू-सासरे आणि सूनांमधील वातावरण हे कौटुंबिक कलहाचे आहे. मात्र माता-पित्यांमुळेच आपण जन्माला आलो आहोत याचे भान राखत प्रत्येकाने नवऱ्याच्या असो वा बायकोच्या जन्मदात्यांचा सन्मान करायला हवा. त्यासाठी हा सोहळा खुपच प्रोत्साहित करणारा ठरणार आहे. डॉ.उल्हास पाटील यांच्यासह संपूर्ण पाटील परिवाराचे आईवरील प्रेम हे यातून दिसून येत आहे विशेषतः मुलाच्या लग्नसोहळ्यापूर्वी हा सोहळा करणे ही संकल्पनाच खुप काही शिकवून जात आहे. माझी आई सुद्धा आज ९७ वर्षाची आहे आणि मी ७९ वर्षाचा आहे. मी सुद्धा स्वतःला खुप भाग्यशाली समजतो की तिचे प्रेम, वात्सल्य, आधार मला माझ्या आयुष्यात आतापर्यंत लाभत आहे. हा मातृवंदन सोहळा सर्वांना बोध देणारा असून त्यासाठी मी मनापासून शुभेच्छा देतो.



– श्री. रमेश विठ्ठल चौधरी,
माजी आमदार, किनगाव

## गोदावरी बाईंचे मॅनेजमेंट उत्तम

विवरा हायस्कूलची मी विद्यार्थीनी आहे. गोदावरी बाई माझ्या शिक्षीका होत्या. अतिशय मनमिळावू व आदर्श शिक्षीका होत्या. दरवर्षी सातवीची तुकडी त्यांच्याकडे असायची. त्यावेळी जिल्ह्यातून ३१ विद्यार्थी निवडले जायचे आणि आमच्या शाळेतून ६ विद्यार्थी निवडले गेले ही अभिमानाची गोष्ट होती. यामागे गोदावरी बाईंची मेहनत होती. पहाटे ५ वाजता बाई घरी बोलावून जास्तीचा अभ्यास करुन घ्यायच्या. मॅनेजमेंट खुप चांगले होते. अभ्यासात कमकुवत विद्यार्थ्यांसाठी हुशार विद्यार्थ्यांकडून तयारी करुन घ्यायचे, त्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांनी हुशार होवून प्रगती केली. केवळ शिक्षीका म्हणूनच नव्हे तर आईची मायाही त्या प्रत्येक विद्यार्थ्यावर करायच्या. गोदावरी बाईंची मेहनत वाखाणण्याजोगी आहे, मला बाईंचा खुप अभिमान आहे. तसेच उल्हास पाटील डॉक्टरांनीसुद्धा आईसाठी घेत असलेला कार्यक्रम ही एक शिकवण असून आई-वडिलांचा योग्य तो मान ठेवला गेलाच पाहिजे. मातृवंदन सोहळा खुपच स्तुत्य आहे.



– सुमन नेमाडे-खाचणे,
माजी विद्यार्थीनी

## आई आमच्याकडे नव्हे तर आम्हीच तिच्याकडे राहतो

आदरणीय उल्हासदादांनी आयोजित केलेला मातृवंदन सोहळा खुपच कौतुकास्पद आहे. आईची महती सर्वांनाच माहिती आहे. मात्र माझ्याबाबातीत असं घडल की, आई नावाचं विद्यापीठ आहे ते ती गेल्यानंतर उलगडले. मात्र उल्हासदादा नशिबवान आहे. ज्यांची आई आहे आणि कोणीतरी डोक्यावरुन मायेचा हात फिरवणारी व्यक्ती असण, हक्कानं रागावणारी व्यक्ती असणं हे भाग्याचं लक्षण आहे. गोदावरी आजी म्हणजे अखंड वात्सल्याचा व प्रेमाचा झरा आहे. दादांनी सुद्धा आईंच्या नावाने सर्व संस्था सुरु केल्या आहेत. एकदा मी उल्हासदादांबरोबर होतो त्यावेळी कोणीतरी सहजच त्यानां प्रश्न विचारला आई कोणाकडे राहते त्यावर उल्हासदादा म्हणाले आई कोणाकडे नाही तर आम्ही आईकडे राहतो, हे घरं आईच आहे, आई आम्हाला वागवते त्यांचे हे उत्तर ऐकुन खुप कौतुक वाटले. आईच्या ऋणातून कोणीही उतरु शकत नाही मात्र काही प्रमाणात उतराई होण्यासाठी हा सोहळा आयोजित केला आहे. माझ्या कुटूंबियांवरही गोदावरी आजींच खुप प्रेम आहे, माझ्या पत्नीची सर्जरी झाली होती. त्यावेळी आजी नाशिकला पाचवा मजला चढून आल्या होत्या, यातून आजींचे आमच्या कुटूंबियांवरील असलेले प्रेम दिसून आले. मातृवंदन सोहळा या कल्पनेला गोदावरी आजींच्या चरणाला वंदन करुन शुभेच्छा देतो.




डॉ.अतुल सरोदे, सावदा

## वासुदेव बाबा व गोदावरी बाईंमुळे आम्ही घडलो

१९७२-७३ ची सातवीची बॅच होती, त्यावेळी मॅट्रिकची ती शेवटची बॅच होती. त्यावेळचे दिवस आजही आठवतात. अतिशय लहान घरात गोदावरी बाई व वासुदेव गुरुजी राहत होते. सकाळी ४ वाजता दोन्ही जण आमची शिकवणी घेत असत, अतिशय कष्टाने ते मुलांना शिकवित असत आज ते मुलं विविध ठिकाणी उच्च पदावर कार्यरत आहे. आमच्यावर जे संस्कार होत असत तेच त्यांच्या मुलांवरही होत असतं. आम्ही जे घडलो जे आज आहोत त्यामध्ये ते प्रतिबिंबित होत आहे. त्यावेळी शिक्षकांना विशेष पगार नव्हता, कमी पैशातही त्यांचा संसार उत्तम सुरू होता. गोदावरी बाईंनी शाळेची व्यवस्थाही उत्तम केली होती, त्यावेळी शेतकरी कुटूंबातील मुले होते, पालकांच्या वेळेनुसार भेटी घेऊन प्रबोधन करीत असत. अभ्यास घेण्याची पद्धत अशी होती की, कित्ता आणि पुस्तक अशी पद्धत होती. हस्ताक्षर सुंदर झालं पाहिजे, कंठस्थ पाढे झालेच पाहिजे, तसेच अभ्यासात कमकुवत असलेल्या सात सात मुलांची बॅच तयार करुन त्यांना पुन्हा शिकवित असत. गावातील श्रीमंतांना ग्रामस्थांशी बोलून शाळेत लागणारे फळे, कंदिल यांची जमवाजमव करीत असत. आमच्या जीवनात गोदावरी बाईंच खुप मोलाचं स्थान आहे, त्या आमच्या गुरु माऊलीचं आहे, उल्हासदादासुद्धा आमच्यासोबत बसून अभ्यास करायचे. वासुदेव गुरुजी आणि गोदावरी बाईंनी जे आमच्यासाठी केलं त्याने आम्ही घडलो. आम्ही भाग्यवान आहोत आम्हाला कधीच विसर पडणार नाही, गोदावरी बाईंच्या चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना करते. उल्हासदादांनी आज बाईंसाठी मातृवंदन सोहळा आयोजित केला आहे खरोखरच खुप चांगला असा कार्यक्रम होत आहे. धन्य आहे ती माऊली....




– अवंतिका देशमुख,
माजी विद्यार्थीनी



## मातृऋण न विसरता येणारे

७ डिसेंबर २०२२ रोजी आयोजित मातृवंदन सोहळा या निमित्ताने प्रथम आदरणीय सुभाषदादा आणि डॉ.उल्हासदादा यांनी आईप्रती प्रेम दाखविण्यासाठी केलेल्या या सोहळ्याबद्दल अभिनंदन करतो. गोदावरी आजीने अतिशय प्रतिकुल परिस्थीतीत दोघांना उच्चशिक्षीत करुन समाजात स्थान निर्माण केल. एका सामान्य घरात सुभाषदादा, उल्हासदादा जन्माला आले. ज्या समाजात आजही गुरुचं स्थान सर्वोच्च आहे असे त्यांचे वडिल कै.वासुदेव गुरुजी. तसेच गोदावरी आजी या दोघ शिक्षक दाम्पत्याच्या घरात जन्माला आले. वडिलांचे छत्र लवकर हरपले आणि मातेनेच सांभाळ केला. त्यामुळे मातृऋण फेडण्यासाठी आयोजित कार्यक्रमाबद्दल करावं एवढ अभिनंदन कमी आहे. आई-वडिलांचे ऋण विसरु नये असा संदेश यातून समाजात जात आहे. डॉ.उल्हास पाटील, सुभाषदादा भाग्यवान आहे ज्यांना आईचे प्रेम मिळत आहे तसेच सेवा करण्याची संधी मिळत आहे. माझ्यावयाच्या २१ व्यावर्षीच आईचे निधन झाले, मात्र वडिलांनी सांभाळ केला, त्यांची सेवा करण्याची संधी मिळाली. गोदावरी परिवाराच्या मातृवंदन सोहळ्याला माझ्या भरभरुन शुभेच्छा.



– श्री लिलाधर चौधरी,
चेअरमन, डीएनसी कॉलेज, फैजपूर

## वात्सल्य, प्रेम, भावना आई शब्दात ठासून भरल्या...

आदरणीय डॉ.उल्हासजी पाटील सर यांनी आपल्या मुलाच्या लग्नाच्या दोन दिवसआधी मातृवंदन सोहळा हा एक आगळा वेगळा कार्यक्रम आयोजन करण्याच कार्य आहे. मातृवंदन सोहळा हे मी सुद्धा प्रथमच ऐकत आहे. त्याबद्दल डॉक्टर साहेबांना मी धन्यवाद देते. समाजामध्ये एक उत्तम संस्कार पोहोचविण्याचा स्तुत्य असा प्रयत्न ते करीत आहे. आदरणीय आईसाहेब श्रीमती गोदावरी वासुदेव पाटील यांनी आपल्या जीवनात आई-वडिल या दोन्ही भूमिका पार पाडल्या. उत्तम संस्कार कुटूंबियांना दिले आहे. त्या शिक्षीका राहिल्या आहेत, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले या थोर विचारवंताचा प्रभाव त्यांच्यावर आहे आणि त्यामुळे अतिशय सुंदर कुटूंब त्यांनी घडविले आहे. आई.. आई.. हे शब्द आपण दिवसभर उच्चारत असतो आणि या शब्दातच किती मोठ्या प्रमाणात वात्सल्य, प्रेम, भावना अतिशय ठासून भरल्या आहेत. आज गोदावरी आईसाहेबांच्या या सोहळ्यानिमित्त त्यांना सुद्धा यामध्ये सामावून घ्यावसं वाटतय कि त्यांनी सुद्धा आपल्या कुटूंबाला सुसंस्कृत बनविले आहे, त्यांच्यामध्ये त्यांच बळ त्या वाढवत आल्या आहेत आणि आज अतिशय उत्तम असं कार्य पाटील कुटूंबियांकडून समाजसाठी होतांना आम्ह बघत आहोत. या मातांनी आपल्या मुलांना फक्त चांगली शिकवण दिली असं नाही तर चांगला समाज घडवून पुढील पिढीला प्रेरणा देण्याचे काम या मातांनी केले आहे. घराघरांमध्ये ही आई संस्कार देत असते आणि म्हणूनच हे सर्व रहाटगाडे उत्तम प्रकारे चालू असते. गोदावरी आईंना शतशः प्रणाम!



– डॉ.मिनाक्षी व्ही वायकोळे, प्राचार्या,
पु.ओ.नाहाटा महाविद्यालय, भुसावळ

## गोदावरी आईंचा प्रवास वंदनीय

आजपर्यंत मी अनेक सोहळे बघितले पण एका मोठ्या यशस्वी व्यक्तीने आईला वंदन करुन आपल्या ऋणाची पृष्टी करण्यासाठी आई सोहळा आयोजित करुन जगातल्या सर्व मातांचे आशीर्वाद प्राप्त केले. जी मुले आपल्या आई वडिलांना स्वतः सक्षम असून ही वृद्धाश्रमात ठेवतात त्यांना चपराक देवून मुलाच्या कर्तव्याची जाणिव करुन दिली. गोदावरी आईंनी फक्त चूल नी मूलच केले नाही तर लग्नाच्या काही वर्षानंतर वासुदेव गुरुजींच्या अचानक जाण्याने संपूर्ण जबाबदारी आईंवर आली. शिक्षणाचे महत्व आई जाणत असल्याने त्यांनी त्याही परिस्थीतीत मुलांना उच्चशिक्षित करण्याचे ठरविले आणि ते पूर्णही केले. आजच्या ५० ते ६० वर्षापूर्वी रुढी परंपरेने जखडलेल्या समाजाला न घाबरता शिक्षीकेची नोकरी करुन सरांना डॉक्टरकीचे शिक्षण दिले आणि आज त्याच अंकुराने गोदावरी फाऊंडेशनअंतर्गत २७ संस्था चालवित असून त्यातून २ हजाराहून अधिक कुटूंबियांचे संसार सुरु आहे. खरतर गोदावरी आईंचा हा प्रतिकुल परिस्थीतीवर मात करुन केलेला प्रवास हा खरच वंदनीय आहे पण नुसताच एक दिवस सोहळा साजरा करुन आपण मातृऋणातून मुक्त होणार नाही तर आपल्या कॉलेजची, हॉस्पीटलची उत्तरोत्तर प्रगती कशी होईल याबद्दल आपण सर्वांनीच प्रयत्नशील असणे ही आपली सर्वांची मातृवंदना होय.



– स्मिता पुराणिक, एक्स रे विभाग, डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय रुग्णालय.

## आई महोत्सव म्हणजे कृतज्ञता सोहळाच

मी लहानपणापासून गोदावरी आई आणि वासुदेव बाबा यांच्या सहवासातच मोठा झालो. जिथे जिथे त्यांची बदली व्हायची, तिथे तिथे माझी रवानगी व्हायची, कित्येक वर्ष तर मला माझी खरी आई कोण आहे हेच माहित नव्हते, यामुळे बऱ्याचदा लोक मला चिडवायचे तु इकडे काय करतोय? आता आठवून हसायला येते. आई व बाबांची एक विशिष्ठ प्रकारची शिस्त होती. कष्टमय दिवस होते. त्यावेळी फारशी सुबत्ता नव्हती. मात्र आईबरोबर आयुष्य कसे मॅनेज करायचे, कमी गोष्टींबरोबर कसे जमवून घ्यायचे हे गोदावरी आईंकडून शिकलो. तसेच वासुदेव बाबांची शिस्त कडक होती, सकाळी ४ वाजता उठवायचे, पहिले दोन तास वासुदेव बाबांबरोबर अभ्यास करायचे तीच परंपरा बाबा गेल्यानंतर उल्हास दादांबरोबर सुरु राहिली. मी आणि दादा सोबत अभ्यास करायचो आणि त्यामुळे आयुष्य सुकर झाले. गोदावरी आईंच्या आठवणी सांगायच्या म्हणजे, तिसरीत असतांना आई, बाबा आणि मी दर रविवारी चिनावलहून विवऱ्याला सायकलवर यायचो. आता चिनावल ते विवरा मोटर सायकलवर जायचे म्हटले तरी काटा येतो. मात्र ते दिवस कसे गेले समजलेच नाही. आईने फार कष्टाने सर्वांना मोठे केले. अगदी घरोघरी जाऊन स्किमचे पैसे जमा करायची, जनसंपर्क दांडगा होता. दोन्ही आयांची माझ्यावर विशेष माया होती. कारण मी सर्वांत लहान होतो. सर्वच भावंड माझे खुप लाड करायचे, माझे हट्ट पुरवायचे, प्रदिपदादा, सुभाषदादा, उल्हासदादा दिपकदादा, प्रमिलाताई, ज्योतीताई सर्वांनीच ... पुण्याला शिकायला असतांना ताईकडे आम्ही जेवायला जायचो. त्यावेळी प्रश्न पडायचे इतकी लोक ताईकडे जेवतात मात्र हिच्याकडे कधीच काही कमी पडत नाही. आम्ही आतापर्यंत तिला गंमतीने विचारतो ताई तु कशी मॅनेज करते, ते सर्व गोदावरी आईमुळेच शक्य झाल्याचे ताई सांगते. आमची आई तशी खुप हळवी, ती सर्वांच्या चुका आपल्या पदरात घेणारी पण गोदावरी आई तशी वेळप्रसंगी परिस्थीतीची जाणिव करुन देणारी होती, ह्या दोघींनी माझ्यावर खुप प्रेम केले व करतातही, सर्व भांवडामध्ये नेहमीच मला झुकते माप मिळते. आईचा असा सोहळा व्हावा ही अभिमानाची गोष्ट आहे, तिच्या कष्टाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीचा हा उपक्रम आहे. तिने जे काही आयुष्यभर आमच्या सर्वांसाठी केलं काही वेळ शिस्तीसाठी किंवा काही वेळेस मायेने केलं. ते खरोखर त्याची जाणिव करुन देणं कठीण आहे पण हा प्रयत्न आहे अस म्हणायला हरकत नाही. मागच्या पाच एक वर्षाची आठवण सांगतो, आम्ही शेजारी शेजारी राहतो, रात्री मला एखाद दिवशी उशिर झाला की आईचा दुसऱ्यादिवशी फोन यायाचा कि किरण काल तुला खुप उशिर झाला यायला, तर गंमतीने वर्षा वहिनी म्हणायच्या अहो तुमचा किरण आता मोठा झाला आहे. याबद्दल आमच्या पुढीच पिढीला आश्चर्य वाटत की यांच्यात असं काय नातं आहे. मात्र आमच्या तिन पिढ्यांचे हे नातं असून हे पुढेही असच चालत राहिल ही आशा आणि इच्छापण आहे. नविन पिढीने पण हे असंच राहाव आणि सर्वांनी एकत्रित राहावे. एकत्रित राहण्याची शक्ती व ताकत ही वेगळी आहे, एकमेकां सोबत राहण्याची व सांभाळून घेत जगण्याची मजा वेगळीच आहे. खुप खडतर परिस्थीती नर्मदा आजी, लक्ष्मी आजी तर आतापर्यंत प्रवास मला तेवढासा आठवत नाही पण बराचसा आठवतो वासुदेव बाबा गेल्यानंतरचे दिवस खडतर होते ती परिस्थीती गोदावरी आईने खुप धीराने सांभाळली आहे हे खुप अतुलनीय आहे. उल्हासदादांनी या सर्व गोष्टीला एक रुप दिले असून तिच्या नावाने फाऊंडेशन स्थापिले. त्याअंतर्गत काम करीत आहे ती कठिण आहे, असं कोणी केलं असेल निगेटिव्ह मधून एवढ सर्व तयार करण त्या प्रत्येक गोष्टीला आईचा हातभार असणे हे खुप महत्वाचे आहे. हा मातृवंदन सोहळा खुप यशस्वी होवो. अशा प्रकारचे सोहळे गोदावरी आईच्या आयुष्यात येत राहो, ही ईश्वरचणी प्रार्थना.



– डॉ.किरण मार्तंड भिरुड, चंद्रमा हॉस्पिटल, जळगाव



### गोदावरी आईंची माया आभाळाएवढी

जीवनात आईचे महत्व फार मोठे आहे. आईची माया ही आभाळाएवढी असते. समर्पण व सेवा भाव हा आईकडे बघून समजतो. आई हा पहिला गुरु असतो आणि या गुरुंकडूनच आयुष्याकडे बघण्याचा, जगण्याचा दृष्टीकोन मिळतो. आपल्या मुलावर निस्वार्थ, निरपेक्ष प्रेम हे फक्त आईच करत असते आणि आज गोदावरी परिवारातील सर्वांवरच गोदावरी आईचा आशीर्वाद आहे, त्यामुळेच सर्वत्र भरभराट होतांना दिसतो आजच्या या मातृवंदन सोहळ्यानिमित्त गोदावरी आई ह्यांना दिर्घायुष्य आणि निरामय आरोग्याच्या शुभेच्छा देतो.



**– श्री. शरद जीवराम महाजन**

### गोदावरी आईंसाठी समर्पणाचा दिवस

गोदावरी ताई माझी आतेबहिण आहे. परिस्थीती जशी आली त्यात समाधानाने राहून शिक्षणाचे कार्य सुरु ठेवले. मुलांनाही कष्टाने घडविले, सुसंस्कारित केले. मुलांनीदेखील आपल्या कर्तृत्वाने गोदावरी आईंचे नाव उंच केले आणि आज होत असलेला हा मातृवंदन सोहळा म्हणजे आईंच्या प्रेमाला, कष्टाला समर्पित केलेला दिवस आहे. या सोहळ्यासाठी हार्दिक शुभेच्छा देतो, गोदावरी ताईला निरोगी आरोग्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.



**– श्री जयंत वायकोळे, सांगवी**

### मातृवंदन – समाजासाठी आदर्श सोहळा

आई-वडिलांच्या ऋणातून उतरणे कधीच शक्य नसते, ज्यांच्यामुळे आपण या जगात आलो, ज्यांनी चांगल्या वाईटाची ओळख करुन कसे वागावे याचे ज्ञान दिले, वेळप्रसंगी रागावून तर काहीवेळेस जवळ घेऊन काळजी करणारे जन्मदाते हेच पहिले गुरु असतात. पाटील परिवाराने हा सोहळा आयोजित करुन समाजासमोर एक आदर्श घालून दिला आहे. पाटील परिवाराने शैक्षणिक, आरोग्य या सेवांच्या माध्यमातून कार्य केले आहे. त्याची प्रेरणा किंवा ते करण्याइतपत सक्षम करण्याचे कार्य गोदावरी बाईंनी केले आहे. या सोहळ्याचे कौतुक करुन गोदावरी आईंना निरामय आरोग्य लाभो ही प्रार्थना करतो.

**– श्री भागवत विश्वनाथ पाटील**
**प्रगतीशील शेतकरी,निंबोल**

### उत्तम माणूस घडविणाऱ्या माऊलीला नमस्कार

मातृवंदन सोहळा आयोजित करुन एक उत्तम कार्य डॉ.उल्हास पाटील सरांनी केले आहे. ज्या मातेने नऊ महिने नऊ दिवस पोटात ठेवून जन्म दिला आहे, त्यानंतरही बोट धरुन चालायला शिकविले, एक उत्तम माणूस म्हणून जिने घडविले आहे अशा आईचे ऋण आपण फेडू शकत नाही. तरीही तिचा सन्मान तसेच तिच्यासमवेत असलेले मातांचा सन्मान करणे हे एक चांगले कार्य आहे, या सोहळ्याबद्दल ऐकून मनस्वी आनंद झाला, गोदावरी आईंना माझा नमस्कार आणि आई महोत्सवास खूप खूप शुभेच्छा.



**– श्री पांडुरंग सराफ,**
**चेअरमन, फार्मसी अँण्ड**
**मॅनेजमेंट कॉलेज, साकेगाव**

### मातृवंदन सोहळा स्तुत्य उपक्रम

आईचे ऋण फेडणे कधीच शक्य नसते मात्र आईने लेकराप्रती उगाळलेल्या आयुष्याची जाणिव ठेवत तिच्यासाठी मातृवंदन सोहळा आयोजित करणे हा खरोखरच स्तुत्य उपक्रम आहे. या सोहळ्यासाठी माझ्या मनापासून शुभेच्छा. गोदावरी आई ह्यांच्या शिस्तीत व संस्कारामुळे हजारो विद्यार्थी घडले. तसेच गोदावरी आईंची मुले देखील सुसंस्कारित झाली. कुठल्याही परिस्थीतीत रहा मात्र माणुसकी विसरु नका अशी शिकवण देणाऱ्या त्या माऊलीला माझा नमस्कार असो...



**– श्री नंदकुमार बेंडाळे, अध्यक्ष, खान्देश कॉलेज एज्यु.सोसा.**

### संस्कारक्षम गोदावरी आई

गोदावरी आई व वासुदेव गुरुजींशी माझा बालपणापासून संबंध असून मोठ्ठी आई व मोठ्ठे बाबा म्हणून मी हाक देतो. गोदावरी परिवाराने जी प्रगती केली, त्याचा मी साक्षीदार आहे. आमचे मोठे बाबा कै.वासुदेव गुरुजी लवकरच आम्हाला सोडून गेले. त्यावेळी प्रतिकुल परिस्थीतीशी झुंजतांना इतक्या जिद्दीने दोघं मुलांना गोदावरी आईने मोठ्ठ केलं आहे, मला वाटतं जिजाऊ आपण कोणी पाहिली नाही मात्र आमची गोदावरी आई जिजाऊ इतकीच जिद्दी आहे आणि तितकीच संस्कारक्षम आहे. त्याच ताकदीने तिने दोघांना मोठ केलं. आज इतकं वैभव असतांना सुद्धा गोदावरी आईंचे पाय जमिनीवरच आहे. साधी राहणी, उच्च विचार गोदावरी आईंचे आहेत. जशी प्रत्येक आई मुलांवर प्रेम करतात, आईंनी सुद्धा प्रेम केले. नातेवाईकांमध्ये मिळून मिसळून राहणे व सर्वांना प्रेम लावणे ही आईची विशेषत: आहे. मातृवंदन हा कृतज्ञता सोहळा आहे आणि गोदावरी आई या १०० वयापर्यंत आम्हाला हव्या असून त्यांची प्रकृती पण उत्तम राहो, ही देवाचरणी प्रार्थना करतो.



**– डॉ.राजेंद्र पाटील,**
**बालरोग तज्ञ, चैतन्य**
**हॉस्पीटल, जळगाव**

### धन्य आहे माऊली..

ज्यांच्याजवळ खूप मायेचं भांडार आहे अशा गोदावरी आई प्रत्येकावर खूप प्रेम करतात. गोदावरी आई ह्या नावाप्रमाणेच निर्मळ आहे. प्रमिलाताई, सुभाषदादा, उल्हासदादांवर त्यांनी चांगले संस्कार केले असून नातवंडावरदेखील त्या संस्कार करीत आहेत. माझ्या पत्नीच्या तेराव्याला गोदावरी आई व केतकीताई आल्या होत्या. त्यावेळी जातांना मी केतकीताईंना म्हणालो आईंना सांभाळून न्या, त्यावेळी केतकीताई म्हणाल्या आम्ही आजीला नाही तर आजीच आम्हाला सांभाळते. गोदावरी आईंच्या संस्कारातून घडलेल्या डॉ.उल्हास पाटील यांनी शून्यातून विश्व उभारलं आहे. प्रत्येकाची आस्थेवाईकपणे विचारपूस आई नेहमीच करतात, धन्य आहे त्या माऊलीला... तिच्या पोटी जन्म झालेले सर्व भाग्यवान आहे. मध्यंतरी गोदावरी आईंची प्रकृती स्वास्थ्य खराब होते, त्यावेळी भेटलो असता आजींनी मायेने माझ्या डोक्यावरुन हात फिरविला, गोदावरी आई ह्या सर्वांच्या आई असून त्यांना निरोगी आयुष्य लाभो, ही मातृवंदन सोहळ्यानिमित्त शुभेच्छा आहे.



**– श्री सोनू गोमा भंगाळे,**
उपाध्यक्ष, गोदावरी लक्ष्मी को-ऑप.बँक

### वंदनीय, महनीय गोदावरी ताई

गोदावरी मैं एक लहर उठी है तेरे नाम की
तुझे मुबारक खुशिया मातृवंदन समारंभ की.

अखंड परिवाराचा झाड एक, अखंड विचाराचं झाड एक, अखंड विश्वासाच झाड एक, अखंड व्रत घेऊन मातृवंदन सोहळा साजरा केला जात आहे. सुभाषदादा, उल्हासदादा, प्रमिलाताई आईबद्दल सांगतात, तुझ्या मूर्तीवानी जगात मूर्ती नाही आणि मला जन्म दिला त्याचे उपकार कधी फिटणार नाही. रक्ताचं केलं पाणी, तुझ्यासारखे कष्ट आई आजपर्यंत केले नाही गं कुणी, बालपणी खेळ खेळूनी असा दिला मेवा, अमृताहूनी गोड गोड पाजिला गं पान्हा...गोदावरी आई म्हणजे धन, आई म्हणजे शिकवण, मातृवंदनदिनी ताईसाठी सांगते, आयुष्याच्या सारीपाटावर पडले मनासारखे दान, राखून ठेवलास गोदावरी ताई तू कायम साऱ्यांचा मान, सर्वांसाठी केले तू जीवाचे रान, स्वत:ला विसरुन ठेवले, कायम भान... वडिलधाऱ्यांची सेवा मनापासून केलीस तू, माता-पित्यांच्या ऋणातून कधीच मुक्त झाली गं, डोंगर केले पार साऱ्या जबाबदाऱ्यांचे, दिवस आले तुला मनमोकळे जगायचे, निर्मळ मनाने सुख जपले साऱ्यांचे, पदरी दान पडले तुझ्या समाधानाचे, सुवर्ण सोहळा, तुझ्या मातृत्व दिवसाचा, शुभेच्छा देते तुला आजच्या दिनाच्या..



**– सौ. आशा रघुनाथ तळेले,**
**संचालिका, गोदावरी लक्ष्मी बँक**

### मातृवंदन – हृदयस्पर्शी सोहळा

मातृछायेपेक्षा कोणीच मोठे नाही. म्हणतात ना, स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी. डॉ.उल्हास पाटील साहेबांनी मातृवंदन सोहळा हा एवढा मोठा कार्यक्रम आयोजित केला आहे, याचे खरोखरच अभिनंदन करतो. आज अनेक ठिकाणी असे बघायला मिळते की, लग्न सोहळ्याप्रसंगी आई कुठेतरी पडलेली असते, तिच्याकडे कोणाचे लक्ष नाही किंवा तिच मतही विचारत घेतले जात नाही या कार्यक्रमामुळे अशी परिस्थीती बदलण्यास प्रोत्साहनच मिळणार आहे. अंत्यंत हृदयस्पर्शी असा हा कार्यक्रम असून जनतेच्यावतीने मी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा देतो.



**– श्री प्रभाकरअप्पा सोनवणे**
**जिल्हा परिषद सदस्य.**